# शेळ्यांचे लसीकरण

**योग्य वेळी लसीकरण करा**
**म्हणजे शेळ्यांच्या रोगराईला नाही राहणार थारा**

अगं अगं ताई कशाची एवढी घाई
शेळी घेऊन कुठे चाललीस बाई

चल चल दादा इथे बसू नको मोकाट
डॉक्टरसाहेब देणार आहेत लसीकरणाची माहिती फुकाट....

ताई ,माई, दादा या हो या
लसीकरण करुन शेळ्या आजारापासून वाचवू या.

आत्ता येईल पावसाळा सावधगिरी पाळा
आंत्रविषाराची लस टोचून घ्या दोन वेळा

पावसाळ्यापूर्वी  पहिली मात्रा नंतर पंधरा दिवसांनी दुसरी मात्रा
वेळ पाळा तंतोतंत म्हणजे आजाराची नाही गुंतागुंत

पाच महिन्यांवरच्या सर्वांना वर्षातून एकदाच टोचा घटसर्पाची लस
परत नाही जनावरे घसा सुजून मरण्याचा त्रास

तीन महिन्यांवरील सर्वांना एकदाच द्या बुळकांडीची लस खास
तीन वर्षे परत बुळकांडी नाही हमखास

असेलच जर सुगावा आजूबाजूला फऱ्या, लाळ, फाशी, देवीचा
तरच धरावा लागतो रस्ता लसीकरणासाठी दवाखान्याचा

लोकहो तुम्हाला सांगतो लसीकरणाबद्दल मोलाचा सल्ला
होईल आजारपण कमी अन् विक्रीतून वाढेल तुमचा गल्ला.




**अखिल भारतीय समन्वित उस्मानाबादी शेळी सुधार प्रकल्प**

पशुसंवर्धन विभाग

NARI **निंबकर कृषि संशोधन संस्था** ICAR

फलटण- ४१५ ५२३ जि. सातारा

ईमेल- nimsheep@gmail.com

**'उपचारापेक्षा प्रतिबंध महत्वाचा' हा उद्देश समोर ठेवून शेळीपालकांनी खालील आजारांविरुध्द शेळ्यांचे लसीकरण करून घ्यावे**

**● नियमित टोचावयाच्या लसी ●**

| आजाराचे नाव व कारणीभूत घटक | प्रसाराचे कारण / माध्यम | आजारांची लक्षणे | लस कैंव्हा टोचावी | लसीची मात्रा |
|---|---|---|---|---|
| **१. आंत्रविषार( ई. टी.)** क्लॉस्ट्रिडिअम परफ्रिंजेन्स नावाचे जीवाणू | पावसाळ्यात उगवलेला व जास्त प्रमाणात खाण्यात आलेला हिरवा लुसलुशीत चारा,चारा पाण्यातील अचानक बदल. जीवाणूमार्फत आतड्यामध्ये तयार झालेल्या विषारी पदार्थाची विषबाधा.हा आजार एका शेळीपासून दुसऱ्या शेळीला संसर्गजन्य नाही. | ताप, जुलाब, जुलाब करताना ओरडणे कळपात लागण झाल्यास १००% मरतूक. | ३ आठवड्यांवरील सर्व शेळ्यांना व करडांना. पहिल्या डोस नंतर १५ दिवसांनी दुसरा (बूस्टर) डोस देणे गरजेचे. दर ६ महिन्यातून एकदा टोचावी. | १ते २.५ मि ली. लस तयार करणाऱ्या कंपनीच्या सूचनेप्रमाणे |
| **२. घटसर्प (एच.एस.)** पाश्चरेला मल्टोसिडा किंवा हिमोलिटीका नावाचे जीवाणू | पावसाळा, हवामानातील बदल, ताण, गर्दी, वातावरणामधील बदल. | श्वास घ्यायला त्रास, गळ्याखाली सूज, नाकातून स्त्राव, भरपूर ताप. कळपात लागण झाल्यास १००% मरतूक. | करडांना ६ महिने वयानंतर व इतर शेळ्यांना दरवर्षी पावसाळ्यापूर्वी एकदा. | २.५ मि .ली. |

**● दर ३ वर्षातून एकदा टोचावयाची लस ●**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **३. सांसर्गिक आंत्रसंस्था दाह (पी.पी.आर )** मॉरबेली नावाचे विषाणू | बाधित जनावरांच्या प्रत्यक्ष संपर्क, श्वास, लाळी वाटे किंवा संपर्कात आलेल्या गव्हाणी, पाण्याची भांडी इत्यादी. | भरपूर ताप, रक्तमिश्रित जुलाब, नाकातोंडातून स्त्राव, तोंडात जखमा, कातडी राठ होणे, गर्भपात, लंगडणे. बाधित शेळ्यांमध्ये ७०-८०% मरतूक. | ३ महिन्यांवरील सर्व शेळ्यांना दर ३ वर्षातून एकदा | १ मि.ली. |

**● आसपासच्या भागात प्रादुर्भाव असेल तरच टोचावयाच्या लसी ●**

| आजाराचे नाव व कारणीभूत घटक | प्रसाराचे कारण / माध्यम | आजारांची लक्षणे | लसीची मात्रा |
|---|---|---|---|
| **४. फऱ्या (बी.क्यू)** क्लॉस्ट्रिडिअम चोवाय नावाचे जीवाणू | दूषित खाद्य किंवा पाण्याबरोबर जीवाणू पोटात जातात. | भरपूर ताप, गुडघ्यांखालील मांसल भागाला सूज व कातडीवर दाबले असता चरचर आवाज, लंगडणे. लागण झालेल्या शेळ्यांमध्ये १०० % मरतूक. | २.५ मि .ली. |
| **५. लाळ खुरकत (एफ.एम.डी)** पिकोरनाविरीडी या वर्गातील O, A, C आणि Asia1 ह्या प्रकारांचे विषाणू | बाधित शेळ्यांच्या श्वासामधून, लाळ, चारा व प्रत्यक्ष संपर्क याद्वारे निरोगी शेळ्यांमध्ये प्रसार | जिभेवर, तोंडात, पायात, कासेवर फोड तोंडातून जास्त प्रमाणात लाळ पडणे. लागण झालेल्या शेळ्यांमध्ये ५०% मरतूक. | १ ते २ मि.ली. कंपनी च्या सूचने प्रमाणे |
| **६. काळपुळी/फाशी (अॅन्थ्रॅक्स)** बॅसिलस अॅन्थ्रॅसिस नावाचे विषाणू | बाधित जनावराच्या संपर्कातून, श्वास, जखमांद्वारे निरोगी शेळ्यांमध्ये प्रसार | डांबरासारखे काळे रक्तमिश्रित जुलाब, नाक, तोंड, कान, गुदद्वार, योनी यामधून काळे रक्त येणे भरपूर ताप, लालसर डोळे. प्रादुर्भाव झालेल्या शेळ्यांमध्ये १००% | १ मि.ली. |
| **७. देवी/बाया येणे (गोट पॉक्स)** कॅप्रिपॉक्स नावाचे जीवाणू | बाधित शेळ्यांचा संपर्क व श्वासाद्वारे पसरतो. | तोंडावर,कानावर,कासेला,जांघेत व शेपटीखाली फोड येतात. त्यामध्ये पू होतो. लागण झालेल्या शेळ्यांमध्ये ५०% मरतूक. | १ मि.ली मेंढ्यांच्या देवीची लस शेळ्यांना टोचू नये |

**टीप** :- वरील सर्व लसी कातडीखाली टोचाव्या लागतात या टोचल्यानंतर त्या जागी व्यवस्थित चोळावे.

१. फुफ्फुसदाह (सी.सी.पी.पी.) ह्या शेळ्यांमधील गंभीर रोगाची लस सध्या भारतात उपलब्ध नाही.

२. वरील रोगांशिवाय शेळ्यांच्या इतर रोगांच्या लशींवर (उदा. जोन्स रोग, स्तनदाह) भारतात संशोधन चालू आहे.

इतर काही रोगांच्या लशी (उदा. काही जीवाणूजन्य रोग, Caseous Lywpradcaitis) परदेशात उपलब्ध आहेत परंतु भारतात नाहीत. ह्या लशी आपल्या देशातील शेळीपालकांना मिळाव्यात म्हणून वेळोवेळी सरकारकडे आग्रह धरला पाहिजे.

करडांना होणाऱ्या 'मावा' ह्या रोगाची लस गावातील जनावरांचे डॉक्टर तयार करू शकतात. त्यासंबंधी अधिक माहिती 'नारी' संस्थेमध्ये मिळेल.

## लसीकरणावेळी घ्यावयाची काळजी

१. निरोगी शेळ्यांनाच लस टोचावी.
२. लसीकरण करण्या अगोदर सुया व सिरिंज पाण्यात उकळून घेतलेल्या असाव्यात.
३. लसीकरण शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी थंड वेळी करावे म्हणजे शेळ्यांवर ताण येणार नाही.
४. लस टोचलेल्या ठिकाणी व्यवस्थित चोळावे म्हणजे तेथे गाठ येत नाही.
५. कातडी खाली लस टोचताना सुई कातडीतून आरपार तर गेली नाही ना हे पहावे.
६. लस टोचण्याआधी ती वापरायचा अंतिम कालावधी पाहून त्याच्या आतीलच वापरावी.
७. गाभण काळात शेवटच्या महिन्यात लसीकरण केल्यास होणाऱ्या करडांना त्यापासून प्रतिकार शक्ती मिळते.
८. कंपनीच्या सूचनेप्रमाणे काही लसी बर्फात ठेवाव्या लागतात. त्याप्रमाणे त्या बर्फात ठेवाव्यात. इतर सर्व लसी उन्हापासून सुरक्षित, थंड व कोरड्या जागी ठेवाव्या.
९. एकाच हंगामात अनेक लसी वापरायच्या असल्यास प्रत्येक प्रकारच्या लस टोचणीमध्ये किमान १० दिवसांचे अंतर असावे.
१०. सर्व लसी कंपनीची सूचना व तज्ज्ञ पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनानेच वापराव्यात.
११. लसीकरण करण्याअगोदर ८-१० दिवस आधी त्या शेळ्यांना शक्यतो जंतनाशक औषध पाजावे म्हणजे लसीकरणाचा चांगला उपयोग होतो.
१२. सर्व प्रकारच्या लसींचे लसीकरण सरकारी पशुवैद्यकीय दवाखान्यात करून मिळते. त्यासाठी सेवाशुल्क म्हणून प्रति लस प्रति शेळीस १ रुपया द्यावा लागतो.
१३. गावातील, वाडी / वस्तीवरील सर्व शेळ्यांचे एकाच वेळी लसीकरण केल्याने लसीची मात्रा वाया न जाता लसीकरण कार्यक्रम यशस्वी होऊ शकतो.

